# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- मौजा – चिखली खुर्द, खसरा क्र. ३७(P), ३९(P) येथील आरक्षण
**{नगर रचना विभाग}** क्र. एस- १६२ Drainage and Sewage Disposal Scheme ही जागा प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया केंद्र व पंपिंग स्टेशनकरीता जागेचे भूसंपादन करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस - २४९६ - २६४३-प्र.क्र. ३००(अ) -९७ - नवी -९, दि ०७.०१.२००० अन्वये भागशः मंजुर झालेली असून ती दि ०१.०३.२००० पासून अंमलात आलेली आहे व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र.-२००/२०००/-नवि-९, दि. १०.०९.२००१ रोजी मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९ दि २७.०२.२००२ सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषीत केलेले होते. तथापी शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४/नवि-९, दि २७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील ७ योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासन निर्णय क्र. टिपीएस -२४१९/ १४१९/प्र.क्र.-१५४ (भाग-१)/२०१९/नवि-९, दि ०९.०४.२०२१ नूसार स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील भाग वगळता ७ योजनेकरीता नागपूर सूधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केले होते. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये आरक्षण क्र. एस-१६२, Drainage and Sewage Disposal Scheme करीता मौजा – चिखली खुर्द येथील खसरा क्र. ४६, ४७, ३७, ३८(पै.), ३९(पै.) मधील २०.०० हेक्टर क्षेत्राची जागा राखीव असून, सदर आरक्षणाकरीता नागपूर महानगरपालिका समुचित प्राधिकरण आहे. विषयांकित जागेकरीता नागपूर सूधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण आहे.

उक्त Drainage and Sewage Disposal Scheme साठी राखीव असलेल्या मौजा – चिखली खुर्द मधील सर्व्हे क्र. ३९ पैकी, नगर भुमापन क्र. ६९ व खसरा क्र. ४१/१, नगर भुमापन क्र. ६५ मधील ३.२० हेक्टर क्षेत्राची जागा STP साठी संपादीत करण्याकरीता अधिक्षक अभिंयता यांनी विभागास कळविले आहे. त्याअनुषंगाने सदर जागेचा संयुक्त मोजणी नकाशा नगर भुमापन विभागाकडून प्राप्त झालेला आहे. त्यानूसार चिखली खुर्द, खसरा क्र. ३९ पैकी नगर भुमापन क्र. ६९ पैकी ३१०२५.५२४१ चौ.मी. क्षेत्राची जागा व खसरा क्र. ४१/२ पैकी, नगर भुमापन क्र. ६५, क्षेत्र ३६०.५१ चौ.मी. असे एकूण ३१३८५.५२४१ चौ.मी. जागा संपादीत क्षेत्र म्हणून दर्शविलेली आहे. तथापी, खसरा क्र. ४१/२, नगर भुमापन क्र. ६५ मध्ये एकूण ०७ जमिनमालक असून, त्यांच्या मालकीचे एकूण क्षेत्र ५.९७ हेक्टर आर असून, त्यापैकी केवळ ३६०.५१ चौ.मी. क्षेत्राची जागा संपादन क्षेत्र म्हणून दर्शविले आहे. तथापी, ३६०.५१ चौ.मी. क्षेत्राची जागा ०७ जमिनमालकांपैकी असल्याने व त्याच्या निश्चित जमिन मालकाचा बोध होत नसल्यामुळे सदरहु जागा संपादीत क्षेत्रात विचारात घेणे योग्य होणार नाही. तेव्हा खसरा क्र. ३९, नगर भुमापन क्र. ६९ मधील ३१०२५.०१४१ चौ.मी. क्षेत्राची जागा संपादन करणेकरीता क्षेत्र ३१०२५.०१४१ चौ.मी. क्षेत्राची जागा STP करीता पुरेशी आहे किंवा कसे, याबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका यांना पत्र क्र. मनपा/नरवि/१८६९, दि. ०८.०१.२०२५ अन्वये विचारणा केली असता, सदर क्षेत्र STP करीता

पुरेशे असल्याचे त्यांनी पत्र क्र. मनपा/सार्व.आ.अभि./अ.अ ४१०/२०२५, दि. ०९.०१.२०२५ अन्वये कळविलेले आहे.

त्यानूसार मौजा- चिखली खुर्द येथील खसरा क्र. ३९ पैकी, नगर भुमापन क्र. ६१ मधील बाधीत ३१०२५.०१४१ चौ.मी. क्षेत्राची खाजगी जागा संपादनाकरीता विचारात घेणे आवश्यक आहे. सन २०२४-२०२५ या वर्षाचे सदर जागेचे बाजार मुल्यदर तक्त्यातील दर रू. १,६६,१०,०००/- प्रती हेक्टर एवढे असून, सदर संपादन क्षेत्र भूसंपादन अधिनियमाअंतर्गत संपादीत करावयाचे झाल्यास सुमारे रू. १०,३०,६५,१००/- एवढी रक्कम परिगणीत होते.

मौजा – चिखली खुर्द, खसरा क्र. ३९(पैकी), नगर भुमापन क्र. ६९ मधील जागेचे एकूण संपादन क्षेत्र ३१०२५.०१४१ चौ.मी. एवढे असून सदर खाजगी जागा संपादन करणेकरीता भूसंपादन अधिनियमाच्या तरतुदीनूसार देय रक्कम विचारात घेता, सदर जागेच्या संपादनाकरीता सूमारे रू. १०,३०,६५,१००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर Drainage and Sewage Disposal Scheme करीता आरक्षित जागा Sewage Treatment Plant या सार्वजनिक वापरासाठी संपादनकरणे व अपेक्षित खर्चाच्या अनुषंगाने प्रशासकीय ठराव पारित करून सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडे सादर करण्याचा प्रश्न विचारात घेणे

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 121/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 18/01/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा – चिखली खुर्द, खसरा क्र. ३७(P), ३९(P) येथील आरक्षण क्र. एस- १६२ Drainage and Sewage Disposal Scheme ही जागा प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया केंद्र व पंपिंग स्टेशनकरीता जागेचे भूसंपादन करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस - २४९६ - २६४३-प्र.क्र. ३००(अ) -९७ - नवी -९, दि ०७.०१.२००० अन्वये भागश: मंजुर झालेली असून ती दि ०१.०३.२००० पासून अंमलात आलेली आहे व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र.-२००/२०००/-नवि-९, दि. १०.०९.२००१ रोजी मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९ दि २७.०२.२००२ सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषीत केलेले होते. तथापी शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४/नवि-९,दि २७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील ७ योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासन निर्णय क्र. टिपीएस -२४१९/ १४१९/प्र.क्र.-१५४ (भाग-१)/२०१९/नवि-९, दि ०९.०४.२०२१ नूसार स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील भाग वगळता ७ योजनेकरीता नागपूर सूधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केले होते. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये आरक्षण क्र. एस-१६२, Drainage and Sewage Disposal Scheme

करीता मौजा – चिखली खुर्द येथील खसरा क्र. ४६, ४७, ३७, ३८(पै.), ३९(पै.) मधील २०.०० हेक्टर क्षेत्राची जागा राखीव असून, सदर आरक्षणाकरीता नागपूर महानगरपालिका समुचित प्राधिकरण आहे. विषयांकित जागेकरीता नागपूर सूधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण आहे.

उक्त Drainage and Sewage Disposal Scheme साठी राखीव असलेल्या मौजा – चिखली खुर्द मधील सर्व्हे क्र. ३९ पैकी, नगर भुमापन क्र. ६९ व खसरा क्र. ४१/१, नगर भुमापन क्र. ६५ मधील ३.२० हेक्टर क्षेत्राची जागा STP साठी संपादीत करण्याकरीता अधिक्षक अभिंयता यांनी विभागास कळविले आहे. त्याअनुषंगाने सदर जागेचा संयुक्त मोजणी नकाशा नगर भुमापन विभागाकडून प्राप्त झालेला आहे. त्यानूसार चिखली खुर्द, खसरा क्र. ३९ पैकी नगर भुमापन क्र. ६९ पैकी ३१०२५.५२४१ चौ.मी. क्षेत्राची जागा व खसरा क्र. ४१/२ पैकी, नगर भुमापन क्र. ६५, क्षेत्र ३६०.५१ चौ.मी. असे एकूण ३१३८५.५२४१ चौ.मी. जागा संपादीत क्षेत्र म्हणून दर्शविलेली आहे. तथापी, खसरा क्र. ४१/२, नगर भुमापन क्र. ६५ मध्ये एकूण ०७ जमिनमालक असून, त्यांच्या मालकीचे एकूण क्षेत्र ५.९७ हेक्टर आर असून, त्यापैकी केवळ ३६०.५१ चौ.मी. क्षेत्राची जागा संपादन क्षेत्र म्हणून दर्शविले आहे. तथापी, ३६०.५१ चौ.मी. क्षेत्राची जागा ०७ जमिनमालकांपैकी असल्याने व त्याच्या निश्चित जमिन मालकाचा बोध होत नसल्यामुळे सदरहु जागा संपादीत क्षेत्रात विचारात घेणे योग्य होणार नाही. तेव्हा खसरा क्र. ३९, नगर भुमापन क्र. ६९ मधील ३१०२५.०१४१ चौ.मी. क्षेत्राची जागा संपादन करणेकरीता क्षेत्र ३१०२५.०१४१ चौ.मी. क्षेत्राची जागा STP करीता पुरेशी आहे किंवा कसे, याबाबत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका यांना पत्र क्र. मनपा/नरवि/१८६९, दि. ०८.०१.२०२५ अन्वये विचारणा केली असता, सदर क्षेत्र STP करीता पुरेशे असल्याचे त्यांनी पत्र क्र. मनपा/सार्व.आ.अभि./अ.अ ४१०/२०२५, दि. ०९.०१.२०२५ अन्वये कळविलेले आहे.

त्यानूसार मौजा- चिखली खुर्द येथील खसरा क्र. ३९ पैकी, नगर भुमापन क्र. ६१ मधील बाधीत ३१०२५.०१४१ चौ.मी. क्षेत्राची खाजगी जागा संपादनाकरीता विचारात घेणे आवश्यक आहे. सन २०२४-२०२५ या वर्षाचे सदर जागेचे बाजार मुल्यदर तक्त्यातील दर रू. १,६६,१०,०००/- प्रती हेक्टर एवढे असून, सदर संपादन क्षेत्र भूसंपादन अधिनियमाअंतर्गत संपादीत करावयाचे झाल्यास सुमारे रू. १०,३०,६५,१००/- एवढी रक्कम परिगणीत होते.

मौजा – चिखली खुर्द, खसरा क्र. ३९(पैकी), नगर भुमापन क्र. ६९ मधील जागेचे एकूण संपादन क्षेत्र ३१०२५.०१४१ चौ.मी. एवढे असून सदर खाजगी जागा संपादन करणेकरीता भूसंपादन अधिनियमाच्या तरतुदीनूसार देय रक्कम विचारात घेता, सदर जागेच्या संपादनाकरीता सूमारे रू. १०,३०,६५,१००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर Drainage and Sewage Disposal Scheme करीता आरक्षित जागा Sewage Treatment Plant या सार्वजनिक वापरासाठी संपादनकरणे व अपेक्षित खर्चाच्या अनुषंगाने प्रशासकीय ठराव पारित करून सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडे सादर करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.